**नि.फौ.ख.क्र. ३७/२०१५**
**सरकार वि. रुपाली**
**निशाणी ५६**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.९ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

**माझे नाव** :– नागनाथ रामदास कांबळे
**वय** :– ३८ वर्षे, **धंदा** :– पोलीस हवालदार/३३१
**नेमणूक व राहणार** :– स्थानिक गुन्हे शाखा, सांगली.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती बी.डी. काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत</u>**

**०१.** सन २०१० ते २०१५ मध्ये मी पोलीस हवालदार आणि पोलीस नाईक या पदावर आटपाडी येथे कार्यरत होतो. दि. २९/०९/२०१४ रोजी मी ठाणे अंमलदार म्हणून आटपाडी पोलीस स्टेशनला हजर होतो.

**०२.** मी कार्यरत असताना कळवेवाडी गावातील रामचंद्र आण्णा गळवे हा इसम तक्रार देण्याकरीता सायंकाळी ५.०० च्या दरम्यान पोलीस स्टेशनला आला होता. रामचंद्र गळवे याने हकीकत सांगितली की, तो सकाळच्या वेळी गावात गेला असताना त्याला समजले की दत्तात्रय वाघमारे यांच्या बाजरी पिकामध्ये एक नवजात पुरुष जातीचे एक दिवसाचे अर्भक त्याग करण्याच्या उद्देशाने कोणीतरी टाकून दिले होते. रामचंद्र गळवे, दत्तात्रय वाघमारे आणि विलास गळवे असे त्याठिकाणी गेले. त्याठिकाणावरुन त्यांनी पोलीस स्टेशन आणि ॲम्बुलन्सला फोन करुन सांगितले. त्यानंतर त्या गावातील ज्ञानू घेरडे याने त्या अर्भकाला पुसून घेतले. सदर ठिकाणी ॲम्बुलन्स व पोलीस आले. अर्भकाला ग्रामीण रुग्णालाय आटपाडी येथे आणले. ग्रामीण रुग्णालय येथे प्राथमिक उपचार करुन सांगली येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले.

**०३.** रामचंद्र गळवे यांनी सांगितल्याप्रमाणे मी फिर्याद अज्ञात महिला इसमाविरुध्द लिहून घेतली. फिर्याद रामचंद्र गळवे यांना वाचून दाखविली. त्यानंतर माझ्यासमक्ष रामचंद्र गळवे यांनी सही केली. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर रामचंद्र गळवे यांची सही व समक्ष म्हणून माझी सही आहे. सदर फिर्याद रामचंद्र गळवे

**नि.फौ.ख.क्र. ३७/२०१५**
**सरकार वि. रुपाली**
**निशाणी ५६**

यांच्या सांगण्याप्रमाणे बरोबर असून त्यातील मजकूर बरोबर आहे. फिर्यादला **निशाणी ५७** देण्यात येते. छापील प्रथम खबर अहवालास **निशाणी ५८** देण्यात येते.

**०४.** फिर्याद घेतल्यानंतर तपास पोलीस हवालदार/१६३२ विलास पवार यांच्याकडे सोपविण्यात आला.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री.पी.डी.जेडगे विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला कोणताही गुन्हा नोंद झाल्यानंतर त्याची नोंद स्टेशन डायरीला घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी याने सांगितलेली तथाकथीत हकीकतची सत्यता मी व्यक्तीः पडताळणी करुन पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे फिर्यादीने मला कोणताही मजकूर सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमधील मजकूर फिर्यादी याने मला सांगितला असे मी माझ्या वरिष्ठांच्या सांगण्यावरुन सांगितला असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी याने फिर्यादमध्ये कथन केलेला कोणताही केलेला कोणताही प्रकार घडलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,
सही/–

दि.१३/०१/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी